**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- मातंसं-१७१६/प्र.क्र.२८६/३९**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - ९ ऑगस्ट, २०१६

**प्रस्तावना:-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि. ०७/०३/१९९८ अन्वये माहिती तंत्रज्ञान संचालनालयाची स्थापना करण्यात आली आहे. माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत विविध मिशन मोड प्रकल्प- उदा. स्टेट डेटा सेंटर, महाराष्ट्र स्वॅन, ई-खरेदी, नागरी सेवा केंद्रे, आधार नोंदणी व अनुषंगिक सेवा राबविण्यात येत आहेत. राज्यात सुरु असलेल्या ई-गव्हर्नन्स प्रकल्पांच्या प्रगतीचे संनियंत्रण माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून करण्यात येते.

माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने स्मार्ट शहरे व स्मार्ट गावे प्रकल्प, सर्व ग्राम पंचायतींना इंटरनेट जोडणी पुरवण्यासाठी भारत नेट प्रकल्प, आपले सरकार पोर्टल तसेच लोकसेवा हक्क अधिनियमाअंतर्गत अधिसूचित सेवा ऑनलाईन करणे इत्यादि नवीन प्रकल्प हाती घेऊन अंमलबजावणी सुरु केली आहे.

वरील प्रमाणे प्रकल्पांची अंमलबजावणी करत असताना, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. माहिती तंत्रज्ञान संचालनालयात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांकडूनच धोरणात्मक बाबी, नवीन प्रणालींचा विकास,कार्यपध्दतीचे सुलभीकरण व सुसुत्रीकरण, MSWAN च्या अंमलबजावणीच्या बाबी, स्टेट डेटा सेंटर, नागरिक सेवा केंद्र, ई-खरेदी याच्याशी संबंधित बाबी हाताळल्या जातात. वरीलप्रमाणे अत्याधिक जबाबदा-या व कार्यबाहुल्यामुळे Specialized Verticals चा अभाव स्पष्टपणे जाणवत असून, त्यामुळे सेवा प्रदान करण्यात विलंब होत आहे.

तांत्रिक क्षमतेच्या अभावामुळे, माहिती तंत्रज्ञान प्रकल्प अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेवर इतर विभागांकडून प्रभावी देखरेख ठेवली जात नाही. त्यामुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होत नाही व खर्चात वाढ होते. काही विभागांच्या बाबतीत सल्लागारांचे काम संपून ते निघून गेल्यानंतर महत्वाच्या माहिती तंत्रज्ञान प्रकल्पावर योग्य तंत्रज्ञान व प्रकल्प व्यवस्थापनाशी संबधित अंतर्गत क्षमतेच्या अभावामुळे असे प्रकल्प ठप्प झाल्याचे दिसून आले आहे. विभागांना ई-प्रशासन प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये सहाय्य करण्याकरिता (विशेषत: जे गुंतागुंतीच्या स्वरुपाचे आहेत) अंतर्गत क्षमता बांधणी करण्याची प्रकर्षाने निकड वाटू लागली आहे. तसेच सिस्टम इंटिग्रेटरच्या बहि:र्गमनानंतर प्रकल्पाशी निगडीत माहिती व ज्ञानाचे हस्तांतरण संबंधित विभागाकडे सुलभतेने पार पडून प्रशासकीय कार्यवाहीची निरंतरता व विभागाकडून ई-गव्हर्नन्स प्रकल्पाची जबाबदारी घेणे या बाबींची निश्चिंतता होणे आवश्यक ठरले आहे.

आंध्र प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, तामिळनाडू व गुजरातसारख्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अग्रगण्य राज्यांमध्ये माहिती तंत्रज्ञान करिता स्वतंत्र प्रशासकीय विभाग अस्तित्वात असून, त्याच्या अधीनस्त माहिती तंत्रज्ञान महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे, या राज्यांमध्ये माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांच्या अंमलबजावणीत गती व गुणवत्ता आली आहे.

उपरोक्त सर्व मुद्दयांचा विचार करता स्वतंत्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ कंपनी स्थापित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. हे महामंडळ कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत शासनाचा अंगीकृत उपक्रम (प्रायव्हेट लिमीटेड कंपनी स्वरुपाचे) तसेच १०० टक्के शासनाच्या मालकीची कंपनी असेल.

२. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळासाठी प्रस्तावित Memorandum of Association मधील मुख्य उद्दिष्टे व अनुषंगिक उद्दिष्टे (शासन निर्णयाच्या जोडपत्र १ नुसार) यांना मान्यता देण्यात येत आहे.

**३. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची कर्तव्ये व जबाबदा-या**

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची कर्तव्ये व जबाबदा-या पुढीलप्रमाणे असतील:-

३.१ शासनाचे विविध विभाग, स्थानिक संस्था, राज्य व केंद्राच्या अधिनियमाअंतर्गत स्थापन केलेल्या संस्था व शासनाच्या मालकीची इतर मंडळे व संस्था यांच्याकरिता नवीन IT/ITeS प्रकल्प (संकेतस्थळाच्या विकासासह मात्र त्यापुरते मर्यादित नाही) हाती घेणे, सुरु असलेले IT/ITeS प्रकल्पांचे व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती करणे, स्मार्ट शहरे,IoT सोल्युशन्स, CERT महाराष्ट्र व Security Operation Centre(SoC), जीआयएस (GIS), सॉफ्टवेअर विकास, आयटी हार्डवेअर, नेटवर्कींग व कनेक्टीव्हीटी, क्लाउड सेवा, एसएमएस आणि पेमेंट गेटवे इ. प्रकल्प स्वत:चे अंतर्गत संसाधने वापरुन किंवा योग्य तज्ञ संस्थेची सेवा घेऊन कार्यान्वयन व देखभाल करणे.

३.२ सदर महामंडळ शासनाच्या वतीने भारत नेट, स्मार्ट शहर इत्यादि प्रकल्पांसाठी विशेष हेतू वाहन (SPV) मध्ये होल्डींग कंपनी म्हणून भूमिका बजावेल.

३.३ हे महामंडळ राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे तसेच केंद्र अथवा राज्याने पारित केलेल्या अधिनियमानुसार स्थापित कंपन्या तसेच संस्था यांच्यासाठी माहिती तंत्रज्ञान विषयक संयंत्रे , साधनसामुग्री व सेवांचा पुरवठा करणारी राज्याची एकमेव यंत्रणा असेल.

३.४ हे महामंडळ राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे तसेच केन्द्र अथवा राज्याने पारित केलेल्या अधिनियमानुसार

स्थापित कंपन्या तसेच संस्था यांच्यासाठी माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यित सेवांकरिता मनुष्यबळ पुरवठा करणारी राज्याची एकमेव यंत्रणा असेल.

३.५ राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे तसेच केंद्र अथवा राज्याने पारित केलेल्या अधिनियमानुसार स्थापित कंपन्या तसेच संस्था यांच्यासाठी त्यांच्या कार्यान्वित तसेच भविष्यात सुरु होणा-या माहिती तंत्रज्ञान / ई-गव्हर्नन्स प्रकल्पांना व एका विशिष्ट उत्पादकाच्या ठराविक संयंत्र किंवा उपकरण किंवा आज्ञावली खरेदी करण्याच्या प्रस्तावासाठी तांत्रिक सहाय्य व सल्ला उपलब्ध करुन देईल.

३.६ स्टेट डेटा सेंटर, स्टेड वाईड एरिया नेटवर्क/ आपले सरकार / आधार नोंदणी अशा पॅनस्टेट पायाभूत सुविधा देणा-या यंत्रणांचे कार्यान्वयन व व्यवस्थापन करेल.

३.७ वरील मुद्दा क्र. (३.३), (३.४) व (३.५) च्या अनुषंगाने, अशा सर्व कार्यालयांना केंद्र शासनाच्या/ राज्य शासनाच्या दर करारानुसार किंवा इतर कुठल्याही यंत्रणे द्वारे माहिती तंत्रज्ञान विषयक संयंत्रे, साधनसामुग्री, सेवा, मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यावर प्रतिबंध राहील.

## ४. महामंडळामार्फत आकारावयाचे सेवा शुल्क

शासकीय विभागांना आवश्यक असणाऱ्या संयंत्रे/ साधन सामग्री व मनुष्यबळ सेवा यांच्या खरेदीकरीता महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ अनुक्रमे ७ टक्के व १० टक्के सेवाशुल्क राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे, तसेच केंद्र अथवा राज्याने पारित केलेल्या अधिनियमानुसार स्थापित कंपन्या तसेच संस्था यांचे कडून आकारेल. प्रकल्प व्यवस्थापनाकरीता प्रकल्प खर्चाच्या १० टक्के एवढे सेवाशुल्क शासकीय विभागाकडून व अधिनस्त कार्यालयांकडून आकारण्यात येईल. माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत दर दोन वर्षानी या शुल्काचा आढावा घेऊन त्यात आवश्यक बदल करण्यात येतील.

## ५. आर्थिक तरतूद

महामंडळाचे अधिकृत भांडवल रु.२५ कोटी व पेड अप भांडवल रु.१० कोटी असेल. महामंडळाला सदर रु. १० कोटी भांडवल राज्य सेतू निधीतून प्रदान करण्यास येईल. महामंडळ आर्थिक दृष्टया स्थिर होईपर्यंत, दैनंदिन कामकाजासाठी महाराष्ट्र राज्य सेतू निधीमधून पुढील तीन वर्षांसाठी, आवश्यकतेनुसार कर्ज स्वरुपात रक्कम देण्यात येईल.

## ६. महामंडळामार्फत प्रकल्पाचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण

६.१ महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाला (IT/ITeS) प्रकल्प नामनिर्देशन तत्वावर सोपविण्यास शासकीय विभागांना परवानगी देण्यात येत आहे. तसेच विभागांना महामंडळाच्या मागणीप्रमाणे प्रत्येक प्रकल्पासाठी अग्रिम निधी महामंडळाला प्रदान करण्यास मान्यता देण्यात आहे.

६.२ महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाला देशातील कोणत्याही राज्यात माहिती तंत्रज्ञान / ई-गव्हर्नन्स प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास परवानगी देण्यात येत आहे, मात्र यासाठी विहित पूर्वपात्रता निकषांची पूर्तता करणे अनिवार्य असेल.

## ७. संस्थात्मक संरचना

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची संस्थात्मक संरचना पुढीलप्रमाणे असेल:-

७.१ महामंडळात पुढीलप्रमाणे ८ संचालक असतील:-

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव/ सचिव, माहिती तंत्रज्ञान | अध्यक्ष |
| २) अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव (वित्त) | संचालक |
| ३) अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव (उद्योग) | संचालक |
| ४) संचालक (माहिती तंत्रज्ञान) | संचालक |
| ५) स्वतंत्र संचालक (माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती) | संचालक |
| ६) स्वतंत्र संचालक (शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित तज्ञ) | संचालक |
| ७) व्यवस्थापकीय संचालक | संचालक |
| ८) मुख्य परिचालन अधिकारी | संचालक (तांत्रिक) |

७.२ व्यवस्थापकीय संचालक हे भारतीय प्रशासन सेवेच्या महाराष्ट्र संवर्गात कार्य करणारे निवडश्रेणीतील अधिकारी असतील, ज्यांची वेतनश्रेणी (३७४००- ६७००० + ग्रेड पे ८७००) पेक्षा कमी नसेल.

७.३ स्वतंत्र संचालक पदावरील व्यक्ती ही माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित तज्ञ असेल.

७.४ महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची संस्थात्मक संरचना जोडपत्र-२ मध्ये दर्शवण्यात आले आहे.

७.५ महामंडळामध्ये तांत्रिक विषयाशी संबंधित महाव्यवस्थापक (CoE for Smart City, Bharatnet, Hardware Procurement, e-Gov Projects, Smart Cities) असेल व त्याला त्या क्षेत्रातील व्यापक अनुभव व त्या विषयाचे प्राविण्य असणे आवश्यक राहील. हे सर्व महाव्यवस्थापक मुख्य परिचालन अधिकारी यांच्या अधिनस्त काम करतील व मुख्य परिचालन अधिकारी हे व्यवस्थापकीय संचालकांच्या अधिनस्त काम करतील. मुख्य परिचालन अधिकारी हा माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ असेल आणि त्याला त्या क्षेत्रातील व्यापक अनुभव असेल.

तसेच मानव संसाधन व प्रशासन, वित्त व लेखा आणि कंपनी व्यवहार असे अन्य विभाग असतील. या विभागांचे प्रमुख त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञ असतील व ते थेट व्यवस्थापकीय संचालकांच्या अधिनस्त काम करतील. वित्त व लेखा आणि मानव संसाधन व प्रशासन प्रमुखांची पदे राज्य शासनाच्या सेवेतील अधिकाऱ्यांमधून जास्तीत-जास्त तीन वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीनेही भरता येतील. या व्यतिरिक्त महामंडळास त्यांनी हाती घेतलेल्या प्रकल्पांच्या आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळाची नेमणूक करता येईल. सद्या महामंडळाचे कामे सुरळीतपणे सुरु करण्यासाठी प्रस्तावित मनुष्यबळाला जोडपत्र ३ मध्ये नमुद केलेल्या तपशिलानुसार रकमा प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. भविष्यात यासंबंधी शासनावर कोणताही आर्थिक भार न येता पुढील निर्णय घेण्याचे अधिकार महामंडळाच्या संचालक मंडळाला राहतील.

**८. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाचा मार्गक्रम** (Road Map)

संस्थात्मक परिपक्वता निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून माहिती तंत्रज्ञान क्षेत्राकरिता विहित केलेल्या मानकांनुसार कार्यवाही करण्यात येईल. महामंडळाच्या स्थापनेपासून ५ वर्षात SEI CMM level ३ प्रमाणपत्र मिळविण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने आवश्यक उपाययोजना करणे व त्यानंतर SEI CMM level ३ प्रमाणपत्र मिळविल्यानंतरच्या ३ वर्षांच्या कालावधीत SEI CMM level ५ प्रमाणपत्र मिळविण्याच्या दृष्टीने आराखडा बनवून त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१६०८०९१७२२१०२२११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Kumar Gautam

Digitally signed by Vijay Kumar Gautam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DIT DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=311cc440015e13fc8ca96250c4963fa20b82548e03a2e70608c928dde34acd2b, cn=Vijay Kumar Gautam
Date: 2016.08.09 18:05:45 +05'30'

**विजय कुमार गौतम**
प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव,
५) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६) सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

८) सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/विशेष सचिव/सचिव
९) अपर मुख्य सचिव( वित्त ), वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई-३२,
१०) प्रधान सचिव (उद्योग ), उद्योग,उर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई-३२
११)* प्रधान सचिव , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१२) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
१३) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१४)* प्रबंधक , मुळ शाखा, मुंबई उच्च न्यायालय , मुंबई
१५)* प्रबंधक , अपील शाखा, मुंबई उच्च न्यायालय , मुंबई
१६)* प्रबंधक , लोक आयुक्त व उपलोक आयुक्त , महाराष्ट्र राज्य , मुंबई
१७)* सचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग , मुंबई
१८) सर्व मंत्रालयीन विभाग
१९) वित्त विभाग (व्यय-४), मंत्रालय, मुंबई-३२,
२०) विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
२१) संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२३) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
२४) महालेखापाल १/२ लेखा परिक्षा महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
२५) महालेखापाल , (वाणिज्यिक लेखा), महाराष्ट्र, मुंबई
२६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२८) सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व क्षेत्रीय कार्यालये
२९) विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
३०) निवड नस्ती

(शासन निर्णय क्रमांक- मातंसं-१७१६/प्र.क्र.२८६/३९, दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ चे सहपत्र)

**जोडपत्र - १**

The proposed main Objectives proposed for the Maharashtra IT Corporation are as follows:

1. Advise the State Government of Maharashtra on (i) various matters including but not limited to devising and implementing strategies, policies, guidelines, processes to develop 'Smart Cities', ‘Digital Villages’, 'Bharatnet', 'Digital India', ‘Cyber Security’ and similar projects under the respective programs initiated by the Government of India; (ii) Information and Communication Technology (ICT) solutions and e-Governance; (iii) addressing technological requirements of various development programmes; (iv) planning a wide range of compatible activities efficient use of land as part of the aforesaid projects or otherwise; (v) providing technology and other infrastructure to cater to multiple governmental initiatives; and (vi) procurement of IT hardware, software and services which is proprietary in nature and vii) promote research, development and entrepreneurship in any one or more of the aforesaid activities/ areas.

2. As nodal IT implementation agency of the State Government of Maharashtra, Build, own or operate, erect, implement and provide on lease or otherwise, end-to-end ICT solutions comprising design, development, testing,

production and installation of software, hardware, networks and establishment and operations of institutions including but not limited to planning, designing, operations and management of State CERT and State Security Operations Center (SOC) and imparting training to all concerned thereof; Acquire, Develop, Operate, Maintain and undertake improvement of technology relating activities such as software, hardware and networks for and/or on behalf of the Maharashtra State Government or any arm, entity, body, agency or corporation thereof; to undertake projects of eGovernance, IT infrastructure and IT enabled services anywhere either through in-house resources or engagement of suitable experts and agencies by outsourcing; to act as incubator, facilitator and/or promoter for projects involving innovation and/or unconventional concepts, in various areas including but not limited to public and other utility and/or welfare services with or without government participation, administration and management of any governmental affair;

3. Establish companies, corporate bodies, associations, or any other type of legal entities including but not limited to joint ventures and special purpose vehicles for undertaking one or more projects, existing or future, defined under various projects/plans/schemes of the Government of Maharashtra and the Government of India; acquire, purchase, merge, amalgamate and/or otherwise take over enterprises and corporate bodies engaged in ICT of any description; enter into various types of

agreements including but not limited to joint venture agreements and concession agreements with enterprises from the private sector; promote start-ups through infrastructure, financial, managerial and technological support as per the policy of Government of Maharashtra; and to operate as agents of the Government of Maharashtra in any capacity in relation to projects and programmes designed to develop, encourage and sustain e-Governance, IT infrastructure and IT enabled services.

The other key ancillary objectives proposed for the Maharashtra IT Corporation are as follows:

1. Mobilise financial resources in the form of capital, debt, hybrid instruments from various sources from within India or outside, from governmental, non-governmental, institutional or other legal sources.

2. Enter into partnership, collaboration, joint venture or any other form of venture agreements.

3. Form, incorporate or establish companies, associations, joint ventures or special purpose vehicles.

4. Overview, review, supervise or otherwise control any capacity building activity, project or mission including budgeting, implementation, and preparation of plan, report thereof, and co-ordination with other missions / schemes and activities of various ministries of Maharashtra State and/or Central Government, and approve and sanction the projects including their technical appraisal.

5. Approve and act upon the reports of a third party review and monitoring agency, monitor and review quality control related matters and act upon issues arising thereof.

6. Pioneer in undertaking benchmarking and setting standards for emerging technologies and public services delivery and government administration practices.

7. Develop a Centre of Excellence for researching, developing and implementing solutions involving innovative technology; break-through concepts in public services delivery and government administration; and standardization and optimization of processes and service delivery.

8. Participate in development of areas specified as Hardware and Software Technology Parks and Information Technology Special Export Zones, to undertake measures to strengthen the base of technology and technology-enabled service.

9. Promote use of IT and ITeS and undertake IT/ITeS projects on turnkey basis in various Departments, Corporations, Companies, Societies, Boards, Urban Local Bodies (ULBs), Panchayati Raj Institutions (PRIs), other Statutory Bodies etc. of Government of Maharashtra

10. Conduct promotions for education of citizen and other stakeholders; and endorsement and advocacy of initiatives undertaken by the Government of Maharashtra, and to solicit information, feedback and suggestions from citizen, industry, academia, government departments and any other stakeholders

11. Undertake all essential measures to develop specialized skills for ensuring availability of skilled manpower in the State to undertake, support and sustain ICT initiatives planned and implemented by the State in Maharashtra or elsewhere, and develop and benefit from inter-linkages of academic institutions and organizations.

12. To undertake cyber security projects such as establishment of CERT, SOC etc. and community education programs and capacity building for cyber security.

13. To undertake exercise of e-Waste management across the State.

14. Determine and collect user charges taxes, surcharges etc., as authorised by the Urban Local Bodies or Panchayati Raj Institutions or other competent authorities for G2C, G2B and G2G services.

15. Devise and develop ICT infrastructure or technology to reduce congestion, air pollution and resource depletion, boost local economy, promote interactions and ensure security.

16. Design and develop Pan-State integrated web based solutions in the e-governance domain based on Pan-State Enterprise Architecture.

17. Ensure development of State wide Enterprise Architecture for Government of Maharashtra including use of space technology tools including but not limited to GIS and bringing in phased manner the various e-governance solutions across all the departments and agencies of the Government on the State Enterprise Architecture platform.

18. Plan, design and promote use of Internet of Things (IoT) in creating 'Smart Solutions', 'Smart Network' and 'Smart Communities'.

19. To act as the Nodal Agency of Government of Maharashtra for creation of innovation hubs, incubators and other necessary initiatives in the furtherance of R&D in the IT sector and in support of flagship programs such as Digital India, Startup India, Make in India, Skills India etc

20. To repair, alter, remodel, clean, renovate, convert, manipulate and prepare for resale and resell any goods and assets, movable and/or immovable from time to time belonging to the Company.

21. To acquire, purchase, takeover, merge, and /or amalgamate business or undertakings of companies or firms which under existing circumstances, from time to time, may conveniently or advantageously be combined with the business of the Company, to amalgamate or merge with companies whose business are so acquired, purchased or taken over and/or

to enter into any agreement with the object of acquisition of such undertaking and/or business, and to demerge any division/business/activity of the Company into a separate company.

22. To create any reserve fund, sinking fund, insurance, fund, or any special fund, whether for depreciation or for repairing, improving or maintaining any of the property of the Company, or for any other purpose conducive to the interests of the Company.

23. To invest the capital or other funds of the Company in the purchase of acquisition of or rights in moveable and immoveable property, to use the capital, funds and assets of the Company as security for borrowing and the acquisition of or rights in moveable or immoveable property, or shares, stocks, debentures, debenture stock, bonds, mortgages, obligations, securities, or to finance their acquisition or leasing or hire purchase.

24. To employ experts to investigate and examine into the conditions, prospect, value character and circumstance of any business concerns and undertaking and generally of any assets, property or rights in which the Company will be interested for its business.

25. To open bank accounts of all natures including overdraft, cash, credit, loan accounts and to operate the same and to draw, make, accept, endorse, discount, execute and issue promissory notes, bills of exchanges, cheques, bills of lading, warrants, debentures and other negotiable or transferable instruments and to deal with all documents, mercantile or otherwise in the ordinary course of business.

26. To form, promote, subside and assist companies having similar objects and partnerships, to promote and acquire any concern as a running business or otherwise or purchase any part of the assets of any concern or any Company or any interest or share thereto and to pay for the same including its goodwill either in cash/or by issue of shares or otherwise and invest the moneys of the Company for the said purposes.

27. To enter into agreements, contracts for, undertake or otherwise arrange for receiving, mailing or forwarding any circular, notice, report, material, brochure, article and thing belonging to any company, corporation, firm, institution or person or persons by means of delivery by hand, electronically or otherwise and to establish, hold or conduct competitions in respect of contribution or information suitable for insertion in any publications of the Company or otherwise for any of the purposes of the Company and to offer and grant prizes, rewards and premiums of such character and on such terms as may be expedient.

28. To purchase, take on lease or in exchange, hire or otherwise acquire, any real and personal property and any rights or privileges which the Company may think necessary or convenient for the purpose of its business or which may enhance the value of any other property of the Company.

29. To open branches, sub-offices, in any state of India or outside India and to appoint agents, sub – agents and brokers to procure business in which this Company may be dealing.

30. To procure the Company registration or recognition in any country, state or place and establish and regulate agencies for the purpose of the Company.


31. To pay all the costs, charges and expenses of and incidental to the promotion, formation, registration and establishment of the Company and issue of its capital including brokerage and commission for obtaining applications, for or taking, placing or underwriting or procuring the underwriting of shares, debentures or other securities of the Company and costs, charges, expenses of negotiations and contracts and arrangement made prior to and in anticipation of the formation and incorporation of the Company, having regard to the provisions of the Companies Act, 2013 and for incidental to the raising of money for the Company.

-------------

(शासन निर्णय क्रमांक- मातंसं-१७१६/प्र.क्र.२८६/३९, दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ चे सहपत्र)

## जोडपत्र- २

## महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची संस्थात्मक संरचना



(शासन निर्णय क्रमांक- मातंसं-१७१६/प्र.क्र.२८६/३९, दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ चे सहपत्र)

## जोडपत्र-३

### Staffing pattern and Cost to Company estimates for the proposed Maharashtra IT Corporation

| Salary and wages | No. of positions | Monthly cost To Company (CTC) (In INR lacs) | Annual CTC (In INR Cr. |
|---|---|---|---|
| Managing Director (IAS) | 1 | 3.00 | 0.36 |
| Chief Operating officer | 1 | 5.00 | 0.60 |
| Financial & Accounts Officer /CA/CS | 1 | 3.00 | 0.36 |
| Legal expert | 1 | 3.00 | 0.36 |
| HOD | 5 | 3.00 | 1.80 |
| Sub-divisional head | 10 | 1.50 | 1.80 |
| Divisional Support Staff | 10 | 0.50 | 0.60 |
| Admin Staff | 10 | 0.50 | 0.60 |
| Total | 39 | | 6.48 |